# Marathi Language Sant Tukaram Essay In Marathi In 200 words

संत तुकाराम महाराज हे महाराष्ट्रातील महान संत आणि कवी होते. ज्यांनी विठ्ठल भक्तीचा प्रचार केला आणि आपल्या सोबत अजून वारकरी घेतले. ते १६व्या शतकात पुण्याजवळील देहू येथे जन्मले. तुकाराम महाराजांचे जीवन आणि त्यांची शिकवण आजही लाखो लोकांना प्रेरणा देते. त्यांनी लिहिलेले अभंग आजही लोकप्रिय आहेत. अमेरिके मध्ये सुद्धा त्यांचा एक अभंग प्रसिद्ध आहे. तो म्हणजे 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' हा अभंग. त्यांच्या आयुष्यात अनेक आव्हाने आणि संकटे होती. परिस्थिती कशी हि असो त्यांनी जनजागृती, संजकल्याण आणि भेदभाव यावर विशेष लक्ष दिले.
तुकाराम महाराजांचे आपल्या अभंगातून सांगतात कि चांगले कर्म करावे, लोकांशी आदराने आणि प्रेमाने वागावे. त्यांनी अगदी सोप्या भाषेत मानवी दुःख आणि आत्मसाक्षात्कार याविषयी गहन सत्य सांगितले आहे. तुकाराम महाराजांचे जीवन साधेपणाचे आणि नम्रतेचे होते. ते विठ्ठल भक्तीत राहून संपूर्ण आयुष्य जगले आणि सांसारिक आसक्तीचा त्याग केला. तुकाराम महाराजांची अशी प्रेरणा घेऊन अनेक संत पुढे झाले. लोकांना भक्तीचे महत्त्व कळू लागले. छत्रपती शिवाजी महाराज सुद्धा संत तुकाराम महाराजांना भेटायला येत. जनकल्याणाचे चांगले विचार त्यांच्याकडून घेत. पुढे त्यांनी सर्व धर्मांच्या एकतेवर भर दिला, ही त्यांच्या शिकवणीतील लोकांसाठी एक महत्त्वाची बाब होती. त्यामुळेच ते आजही महाराष्ट्रात पूजनीय मानले जातात आणि त्यांच्या अभंगांचे पाठ लोक आवडीने करतात.